


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २४६, रविवार १६ जुन २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## अस्तित्वात नसताना ३५ शॉप, २५ फ्लॅटची नोंद !

■ मा. नगराध्यक्ष विजय औटीपुढील अडचणी वाढल्या ■ मुख्याधिकारी शिपाई यांचे गुन्हा दाखल करण्यासाठी पोलीसांना पत्र ■ औटी व त्याच्या सहकाऱ्यांना तडीपार करा ■ असिम सरोदे यांची मागणी

**पारनेर / पुणे : प्रतिनिधी**

**पारनेर नगरपंचायत हद्दीतील गट क्र. ३९०३,३५५४/१, ३५४०/१ व ३५४४/२ मिळकत नंबर २५९४/२५९६ या जमीनीवर भैरवी अपार्टमेंट अस्तित्वात नसतानाही नगरपंचायत मागणी रजिस्टर तथा नमुना नं ८ वर ३५ शॉप व २५ फ्लॅटची बेकायदेशीर नोंद लावून बनावट सात बारा उताऱ्याच्या आधारे बनावट कागदपत्रे तयार करून नगरपंचायत पारनेर प्रशासनाचा खोटा पुरावा सादर करून फसवणूक केल्याप्रकरणी मा. नगराध्यक्ष विजय औटीसह इतर दोघांवर गुन्हा दाखल करण्यासंदर्भात पारनेर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी विनय शिपाई यांनी पारनेर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्ष समिर बारवकर यांना पत्र दिले आहे.**






गुन्हा दाखल करण्याकामी छबन रघुनाथ औटी, राजेंद्र भाऊसाहेब पठारे व माधव मारूती गाजरे यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. दरम्यान, या प्रकरणी नगरपंचायतीच्या प्राधिकृत कर्मचाऱ्यांचा जबाब नोंदवून याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांनी सांगितले.

पारनेर नगरपंचायतीच्या अधिकाऱ्यांच्या पथकाने दि. २८नोव्हेंबर २०२३ रोजी संबंधित मिळकतीची स्थळ पाहणी केली असता त्या मिळकतीवर भैरवी अपार्टमेंट इमारत अस्तित्वात नाही. मात्र नगरपंचायत मागणी रजिष्टर तथा नमुना नं ८ वर भैरवी अपार्टमेंट असा उल्लेख करून त्यावर एकूण ३५ शॉप व २५ फ्लॅटची बेकायदेशीर नोंद आढळून आल्याचे संबंधीत तपासणी अहवालात स्पष्ट झाले आहे. सदर नोंद दुय्यम निबंधक पारनेर यांचयाकडे दस्त ५७१७/२०१५ दि.२८/१०/२१०५ सुची क्र. २ अर्जावरून नगरपंचायत दप्तरी नोंद केल्याचे सिध्द होत असल्याचे नगरपंचात मुख्याधिकाऱ्यांच्या पत्रात म्हटले आहे.

प्रत्यक्षात भैरवी अपार्टमेंट व त्यावर ३५ शॉप व २५ फ्लॅट नसतानाही नगरपंचायत प्रशासनाकडे खोटा अर्ज सादर करून नगरपंचायत प्रशासनाला खोटी माहीती सादर करून बनावट माहीतीच्या व कागदपत्रांच्या अधारे नोंदणी नं ८ रजिस्टरला खोटी नोंद लावून काहीतरी हेतू साध्य करण्याच्या इराद्याने जमीन मालक विजय सदाशिव औटी, संभाजी बबन मगर, विजया भागाजी नवले सर्व रा. पारनेर यांनी नोंदणी नं ८ रजिष्टरला खोटी नोंद लावून बनावट दस्त तयार करून घेतल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी या पत्रात करण्यात आली आहे.

दरम्यान, खा. नीलेश लंके यांचे सहकारी ॲड. राहुल झावरे यांच्यावर जीवघेणा हल्ला केल्याप्रकरणी विजय औटी व त्याच्या सहकाऱ्यांवर खुनाचा प्रयत्न तसेच इतर कलमांन्वये गुन्हे दाखल असून औटीसह इतर तिघे सध्या पारनेर पोलीस ठाण्याच्या न्यायालयीन कोठडीत आहेत. अशातच पारनेर नगरपंचायतीनेही औटी याच्यासह इतर तिघांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केल्याने औटीच्या अडचणीत वाढ झाली आहे.

**पुणे : प्रतिनिधी**

**पारनेर न्यायालयातील वकील व खा. नीलेश लंके यांचे सहकारी ॲड. राहुल बबनराव झावरे या जीवघेणा हल्ला करणा-या विजय औटी, त्याचा भाव नंदकुमार औटी व प्रितेश पानमंद यांच्यावर संघटीत गुन्हेगारी कायद्यांतर्गत कायमस्वरूपी तडीपार करण्याची मागणी ज्येष्ठ विधीज्ञ असिम सरोदे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे केली आहे.**

सरोदे यांनी नमुद केले आहे की, फसवणूक करणे, सरकारी कामात अडथळा आणून अधिकाऱ्यांना मारहाण करणे, मयताच्या जमीनीची खरेदी विक्री करणे, जीवे मारण्याची धमकी देऊन खुनाचा प्रयत्न करणे, पदाचा दुरूपयोग करून नगरपंचायतमध्ये खोटया नोंदी करणे, बनावट कागदपत्रे तयार करून बँका, पतसंस्थांकडून कर्ज घेऊन औटी व त्याच्या सहकाऱ्यांनी आर्थिक गुन्हे केलेले आहेत. विजय औटी व त्याच्या सहका-यांवर पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हेही दाखल आहेत. विजय औटी याने त्याच्या पदाचा गैरवापर करून नगरपंचायतमध्ये केलेल्या खोटया नोंदीप्रकरणी पारनेर नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांनी पारनेर पोलीसांकडे विजय औटी व त्याच्या सहकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यासाठी पत्र दिले असल्याचे सरोदे यांनी म्हटले आहे. विजय औटी व त्याचे सहकारी संघटीत गुन्हेगारी करून समाजात दहशतीचे वातावरण करीत असल्याने त्यांना कायमस्वरूपी तडीपार करणे गरजेचे असल्याची आग्रही मागणी सरोदे यांनी केली आहे.

विजय सदाशिव औटी त्याचा भाऊ नंदू औटी, प्रितेश पानमंद, अंकुश ठुबे, नीलेश उर्फ धनू घुमटकर, संगम सोनवणे, नामदेव औटी, मंगेश कावरे, पवन औटी, प्रमोद रोहोकले, प्रथमेश रोहोकले, सुरेश औटी व इतर अनोळखी ३ ते ४ इसमांनी ॲड. राहुल झावरे यांच्यावर दि.६ जुन रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास पारनेर शहरातील आंबेडकर चौकात प्राणघातक हल्ला केला होता. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेले ॲड. झावरे हे आजूनही अतिदक्षता विभागात उपचार घेत असून त्यांच्यावरील काही शस्त्रक्रियाही अद्याप प्रलंबित आहेत.

## महाविकास आघाडीने शिंदे, दादांच्या परतीचे दोर कापले

■ जे गेले त्यांना आम्ही परत घेणार नाही
■ उद्धव ठाकरे, शरद पवारांनी स्पष्ट केली भूमिका

**मुंबई : प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मिळालेल्या यशामुळे आघाडीतील नेत्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. त्यात शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी पुन्हा एकदा पक्षातून गेलेल्यांना पुन्हा पक्षात घेण्यास स्पष्ट शब्दात नकार दिला आहे. जे गेले त्यांना आम्ही परत घेणार नसल्याचे उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केले आहे. तर गेलेल्या लोकांना परत घेण्याचा प्रश्नच येत नसल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या दोन्ही नेत्यांनी व्यक्त केलेल्या या मतांमुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे परतीचे दोन कापले गेले असल्याचे दिसून येत आहे. तर दुसरीकडे त्यांच्यासोबत गेलेल्या आमदारांचा प्रश्न देखील गंभीर होणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.**




लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला अपेक्षेपेक्षा जास्त चांगला विजय मिळाला आहे. तर दुसरीकडे महायुतीचा दारूण पराभव झाला आहे. त्यामुळे महाविकास आघाडीने आता विधानसभा निवडणुकीत स्पष्ट बहुमत मिळवणार असल्याचा विश्वास व्यक्त केला आहे. त्या संदर्भातील मविआची प्राथमिक बैठक आज मुंबईत पार पडली. या बैठकीनंतर महाविकास आघाडीची महत्त्वाची पत्रकार परिषद झाली. या पत्रकार परिषदेत गेलेल्या नेत्यांना पुन्हा पक्षात घेणार का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर उद्धव ठाकरे यांनी शरद पवार यांनी उत्तर दिले आहे. त्यांना परत घेण्याचा प्रश्नच नसल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे.


लोकसभा निवडणुकीत आमच्यासोबत राहिलेल्या आणि संघर्ष करणाऱ्या सर्वांना सोबत घेऊन आम्ही पुढे जाणार असल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. इतकेच नाही विधानसभा निवडणूक महाविकास आघाडी एकत्र लढणार असल्याचा विश्वास उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला. आमच्यात कोणीही छोटा भाऊ किंवा मोठा भाऊ नाही. तर सर्वांना एकत्र घेत निवडणुकीला सामोरे जाणार असल्याचे ठाकरे यांनी म्हटले आहे.

## साहित्य अकादमीचा पुरस्कार भारत सासणे यांच्या कादंबरीला जाहीर

देविदास सौदागर यांची 'उसवण' युवा पुरस्काराची मानकरी

**पुणे : प्रतिनिधी**

**साहित्य अकादमीच्या वतीने ज्येष्ठ साहित्यिक भारत सासणे यांच्या 'समशेर आणि भूतबंगला' या कादंबरीला बालसाहित्याचा पुरस्कार जाहीर झाला असून शिवणकाम करीत लेखन करणारे तुळजापूर येथील देविदास सौदागर यांची 'उसवण' कादंबरी युवा पुरस्काराची मानकरी ठरली आहे. विविध भाषांतील बालसाहित्य तसेच युवा पुरस्कारांची घोषणा साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांनी शनिवारी केली.**




यामध्ये असामी, बंगाली, बोडो, डोगरी, इंग्रजी, गुजराती, हिंदी, कन्नड, काश्मिरी, कोकणी, मैथिली, मल्याळम, मणिपुरी, मराठी, नेपाळी, उडिया, पंजाबी, राजस्थानी, संताली, सिंधी, तमिळ, तेलगू आणि उर्दू भाषेतील लेखकांच्या पुस्तकांचा समावेश आहे. संस्कृत भाषेतील पुरस्कारांची घोषणा नंतर केली जाणार आहे.

मराठीमध्ये ज्येष्ठ साहित्यिक आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष भारत सासणे यांच्या 'समशेर आणि भूतबंगला' या कादंबरीला बालसाहित्याचा पुरस्कार जाहीर झाला असून शिवणकाम करीत लेखन करणारे तुळजापूर येथील देविदास सौदागर यांची 'उसवण' कादंबरी युवा पुरस्काराची मानकरी ठरली आहे. सरस्वती सन्मानप्राप्त ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शरणकुमार लिंबाळे, किरण गुरव आणि श्रीकांत उम्रीकर यांच्या परीक्षक समितीने मराठी भाषेतील युवा पुरस्काराच्या साहित्यकृतीची निवड केली.

**साहित्य अकादमीचा पुरस्काराचा आनंद**

बालसाहित्याच्या लेखनासाठी साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्याचा आनंद झाला आहे. प्रत्यक्षात अनेक वर्षे मी बालसाहित्य लिहित आहे. समशेर आणि भूतबंगला' या कादंबरीतील पात्र जाणीवपूर्वक निर्माण करून कुमार आणि किशोरवयीन मुलांमध्ये रूजविण्याचा प्रयत्न केला. उर्वरीत पान ३ वर

## "मराठा समाजामध्ये भाजपाबद्दल असंतोष"

मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांची कबुली

**मुंबई : प्रतिनिधी**

**मराठा समाजामध्ये भारतीय जनता पक्षाबद्दल असंतोष असल्याचेचंद्रकांत पाटीलयांनी शुक्रवारी मुंबईत माध्यमांशी बोलताना मान्य केले. "भाजपाने मराठा समाजाला वेळोवेळी आरक्षण आणि सुविधा दिल्या. मात्र, पण त्यानंतरही मराठा समाजात भाजपाबद्दल असंतोष आहे असेआमच्या चर्चेतून समोर आलं आहे. हा असंतोष का आहे? यावर आमची सविस्तर चर्चा झाली.**



शेवटच्या मराठा माणसापर्यंत आम्ही दिलेल्या गोष्टींबाबत माहिती पोहोचवण्यात, योजनांची मदत पोहोचवण्यात कमी पडलो आहोत. ही माहिती मराठा समाजापर्यंत पोहोचवली पाहिजे", असे चंद्रकांत पाटील म्हणाले. लोकसभा निवडणुकांनंतर आता विधानसभा निवडणुकांचे वेध सर्वच राजकीय पक्ष, उमेदवार आणि विश्लेषकांना लागले आहेत. लोकसभा निवडणुक निकालांचे पडसाद विधानसभा निवडणुकांवरदेखील पडण्याची शक्यता लक्षात घेऊन त्यानुसार सर्वच राजकीय पक्ष कामाला लागल्याचे दिसत आहे. विशेष म्हणजे महायुतीच्या जागा मोठ्या प्रमाणावर कमी झाल्यामुळे या पराभवाची कारणं आणि पुढील धोरण यासंदर्भात युतीच्या मित्रपक्षांत मोठ्या प्रमाणावर विचारमंथन चालू आहे. त्याचाच एक भाग म्हणून खुद्द देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रीपद सोडण्याची तयारी दाखवलेली असताना आता चंद्रकांत पाटील यांनी यासंदर्भात हे महत्त्वाचे विधान केले आहे.

"अण्णासाहेब पाटलांनी मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी १९८२ साली आत्महत्या केली. पण १९८२ ते १९९५ पर्यंत अण्णासाहेब पाटलांच्या नावाने साधं महामंडळ करण्याचाही विचार त्या वेळच्या राज्यकर्त्यांच्या डोक्यात आला नाही. पहिले अण्णासाहेब पाटील महामंडळ १९९५ साली आले. त्यानंतर आमचे सरकार गेले. पुढच्या जवळजवळ १५ वर्षांत ५० कोटींच्या वर या महामंडळासाठी तरतूद गेली नव्हती. २०१४ नंतर ती तरतूद हजार कोटींपर्यंत गेली", असे चंद्रकांत पाटील म्हणाले.

**"तरी मराठा समाजाचा आमच्यावर रोष आहे?"**

दरम्यान, भाजपानं इतक्या सगळ्या गोष्टी करूनही मराठा समाजाचा भाजपावर रोष का आहे? असा प्रश्न चंद्रकांत पाटील यांनी यावेळी उपस्थित केला. "पहिल्यांदा देवेंद्र फडणवीसांनी आरक्षण आणि सवलती या गोष्टी वेगळ्या केल्या. आरक्षण मिळेपर्यंत ओबीसींच्या सगळ्या सवलती मराठा समाजाला दिल्या. हे इतिहासात पहिल्यांदा घडलं. हे देवेंद्र फडणवीसांनी केलं. २०१७ साली मराठा समाजाला आरक्षण दिले. ते उर्वरीत पान ३ वर

## राष्ट्रवादीच्या वाट्याचे राज्यमंत्रीपद कुणाला मिळणार?

सुनेत्रा पवारांनी व्यक्त केली मंत्री होण्याची इच्छा

**पुणे : प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अजित पवार गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचा नुकताच बारामती लोकसभा मतदारसंघात सुप्रिया सुळे यांच्याकडून पराभव झाला. त्यानंतर काही दिवसांतच त्यांना राज्यसभेसाठी उमेदवारी देण्यात आली आहे. प्रफुल्ल पटेल यांच्या राजीनाम्यानंतर रिक्त झालेल्या जागेसाठी सुनेत्रा पवार यांनी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल केल्यानंतर पुण्यात पत्रकार परिषदेला संबोधित करत असताना सुनेत्रा पवार यांना राज्यमंत्रीपदाबाबत प्रश्न विचारण्यात आला होता. यावेळी त्यांनी मंत्रीपदाबाबत आपण सकारात्मक असल्याचे म्हटले. त्यामुळे आता राष्ट्रवादीच्या कोट्यातले एक मंत्रीपद अजित पवार यांच्या पत्नीला मिळणार का? अशी चर्चा सुरू आहे.**



सुनेत्रा पवार यांना राज्यमंत्रीपद देण्यात यावे, असा ठरावपुणेशहर राष्ट्रवादीकाँग्रेसपक्षाने केला आहे. अशी संधी मिळाली तर राज्यमंत्रीपदाची जबाबदारी घेणार का? असा प्रश्न सुनेत्रा पवार यांना पत्रकार परिषदेत विचारण्यात आला. यावर त्यांनी उत्तर दिले की, "माझ्या पक्षाचे हे मोठेपण आहे. त्यांना माझ्याकडून अपेक्षा आहेत. मला जर संधी मिळाली तर नक्कीच त्या संधीचे सोने करण्यासाठी मी प्रयत्न करेन.".

बारामतीमधील पराभवाबाबत बोलताना सुनेत्रा पवार म्हणाल्या की, लोकसभा निवडणुकीत प्रचारादरम्यान आम्हाला अतिशय चांगला प्रतिसाद मिळत होता. पण जनतेचा कौल आता स्वीकारावा लागेल. पराभव का झाला, याचे विश्लेषण आम्ही करत आहोत. त्यातून आत्मपरिक्षण नक्कीच केले जाईल. काय घडले, याचा शोध घेऊन पुढील निवडणुकीत त्यावर काम करण्याचा प्रयत्न करू.

**बारामतीमध्ये नवीन दादा होणार का?**

बारामतीमध्ये केंद्रात ताई आणि राज्यात दादा, असे सूत्र पाहायला मिळत होते. उर्वरीत पान ३ वर






# तंत्रमंत्र
विज्ञानयुगातील बितंबातम्या



## पासवर्ड असे ठेवा सेव्ह!

**तुमचे सगळे पासवर्ड सुरक्षितरित्या सेव्ह करण्यासाठी काही अ‍ॅप्स मदत करतात, त्याविषयी...**

- ब्लर : हे अ‍ॅप्लिकेशन पासवर्ड सेव्ह करण्याबरोबरच पासवर्ड तयार करण्यासाठी आणि ते ऑटो-फील करण्यासाठी सुद्धा वापरता येऊ शकतं. लॉग इन आणि पासवर्ड यामध्ये लॉग इन इन्फॉर्मेशन अ‍ॅड करता येते. अ‍ॅड केलेली माहिती नंतर कॉपी, एडीट आणि डिलीट करता येते. यामध्ये स्वतंत्र प्रायव्हेट ब्राऊजर उपलब्ध आहे जो वापरून एखाद्या वेबसाइटवर आपलं लॉग इन आणि पासवर्ड ऑटोफिल करता येतात. हे अ‍ॅप्लिकेशन आयओएस, अँड्रॉइड, विंडोज आणि मॅक यावर उपलब्ध आहे.
- स्टिकी पासवर्ड : स्टिकी पासवर्ड अ‍ॅप्लिकेशन पासवर्ड सेव्ह करून ते ऑटोफिल करण्याची सुविधा देतं. हे अ‍ॅप्लिकेशन विंडोजसाठी असलेले क्रोम, क्रोमियम, फायरफॉक्स, थंडरबर्ड, इंटरनेट एक्सप्लोरर या ब्राऊजरवर तर अँड्रॉइडसाठी फायरफॉक्स, डॉल्फीन आणि यूसीवेब या ब्राऊजरवर आणि आयओएसवर सफारी या ब्राऊजरवर वापरता येतं. मॅकवर हे सफारी बरोबरच क्रोमवर सुद्धा वापरता येतं.
- डॅशलॅन : आयओएस, अँड्रॉइड, विंडोज आणि मॅक यावर उपलब्ध असणारं हे अ‍ॅप्लिकेशन पासवर्ड सेव्ह करून ते ऑटोफिल करण्यास मदत करतं. जर आपण वापरात असलेली एखादी साइट सेक्युअर नसेल तर तसं सूचितही करतं. यामुळे संभाव्य धोका टळू शकतो. या अ‍ॅप्लिकेशनमध्ये अन्य अ‍ॅप्लिकेशन जसे की वन पासवर्ड, रोबोफोर्म आणि लास्टपास यात सेव्ह केलेली माहिती इम्पोर्ट करण्याची सुविधा आहे. यात आपण सेव्ह केलेली माहिती फक्त आपल्या डिव्हाइसवर ठेवायचा पर्यायसुद्धा दिला गेला आहे.
- पासवर्ड बॉस : पासवर्ड सेव्ह करून ऑटोफिलची सुविधा देणारं हे अ‍ॅप्लिकेशन विंडोज, अँड्रॉइड, आयओएस यावरच उपलब्ध आहे. मॅक आणि लिन्युक्स यावर हे अ‍ॅप्लिकेशन उपलब्ध नाही. वन पासवर्ड, रोबोफोर्म आणि लास्टपास हे डॅशलॅन बरोबरच क्रोम, इंटरनेट एक्सप्लोरर, फायरफॉक्स, ओपेरा आणि एज या ब्राऊजर्समधून सुद्धा लॉगिन माहिती यात इम्पोर्ट करता येते.

### ही काळजी घ्या...

- ठरावीक कालावधीनंतर पासवर्ड बदला.
- पुन्हा तोच पासवर्ड ठेवणं टाळा.
- पासवर्डमध्ये नंबर, स्पेशल कॅरॅक्टर, कॅपिटल आणि स्मॉल लेटर्स ठेवून तो अधिक सुरक्षित करावा.
- अन्य कोणाशीही पासवर्ड शेअर करू नये.
- पासवर्डमध्ये आपली वैयक्तिक माहिती जसं की नाव, जन्मतारीख याचा वापर करणं टाळा.
- सगळ्या ठिकाणी एकच पासवर्ड वापरू नये.
- जर पासवर्ड कुठे स्टोअर केले असतील तर ते अन्य कोणाला सहज मिळणार नाहीत याची काळजी घ्यावी.
- आठ ते बारा कॅरेक्टर्सचा पासवर्ड हा अधिक सुरक्षित मानला जातो.

## ८४ टक्के लोक जोडीदाराशी शेअर करतात पासवर्ड!

आपण कितीही प्रायव्हसीच्या गोष्टी करत असलो तरी ८४ टक्के भारतीय त्यांचे पासवर्ड त्यांच्या जोडीदाराबरोबर शेअर करत असल्याचं एका अभ्यासातून समोर आलं आहे. इलेक्ट्रॉनिक गॅझेट्स, सोशल मीडिया हे सगळं सध्याच्या जीवनशैलीचा एक भाग आहे. दोघांच्या नात्यामध्ये तंत्रज्ञानाचा वापर महत्त्वाचा ठरत असून जोडीदाराबरोबर पासवर्ड शेअर करण्यात काहीच चुकीचं नसल्याचं अनेकांना वाटतयं. मॅक्फी संस्थेच्या एका अहवालातून ही बाब समोर आली आहे. ६०० लोकांचा सर्व्हे करण्यात आला. त्यानुसार, तंत्रज्ञानाचा वापर नात्याचा एक भाग असल्याचं मत ७७ टक्के लोकांनी व्यक्त केलं. नात्यात प्रायव्हसी महत्त्वाची असते, असं ८९ टक्के भारतीयांनी सांगितलं. ६७ टक्के तरुण मुला- मुलींना वाटतं की त्यांच्या जोडीदाराचं त्यांच्यापेक्षा इंटरनेटवरच जास्त लक्ष असतं. तर, ८१ टक्के भारतीयांच्या मते, त्यांचे मित्र व कुटुंबातील सदस्य त्यांच्या सोबत असतानाही मोबाइलमध्येच जास्त रमलेले असतात.

# ऑनलाइन फसवणुकीच्या वाढत्या घटना



देशात अलीकडच्या काही वर्षांत अनेक लोकांनी डिजिटल आर्थिक व्यवहार सुरू केल्याचे चित्र आहे. याचाच गैरफायदा घेऊन आर्थिक सायबर क्राइम वाढल्याचे या सर्वेक्षण अहवालात म्हटले आहे. एफआयएस या नवनव्या तंत्रज्ञानावर आधारित आर्थिक सेवा उपलब्ध करून देणाऱ्या कंपनीच्या वतीने हा अहवाल नुकताच तयार करण्यात आला आहे. भारतीयांनी डिजिटल तंत्रज्ञानावर स्वार होऊन कॅशलेस आर्थिक व्यवहारांत वेग धरला असला, तरीही डिजिटल व्यवहार करताना कुठली काळजी घ्यावी, काय करावे आणि काय करू नये, स्वतःची खासगी माहिती गुप्त ठेवून फिशिंग मेलपासून स्वतः चे आर्थिक रक्षण कसे करावे, याबाबत मात्र त्यांच्यात पुरेशी जागृती झालेली नाही, असे या अहवालात म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर बँकांची जबाबदारी वाढली असून, डिजिटल व्यवहारांसाठी त्यांनी ग्राहकांना अधिक सुरक्षित तंत्रज्ञान उपलब्ध करून द्यायला हवे; तसेच ग्राहकांना हे व्यवहार सुरक्षितपणे कसे करावेत, याचे प्रशिक्षणही द्यावे, अशी मागणी आता जोरकसपणे पुढे येताना दिसून येत आहे.



**एकीकडे देशातील डिजिटल आर्थिक व्यवहारांत वाढ होत चाललेली असतानाच दुसरीकडे ऑनलाइन आर्थिक गुन्हेगारीदेखील वेगाने वाढत असल्याचे धक्कादायक वास्तव एका सर्वेक्षणातून पुढे आले आहे. डिजिटल व्यवहारांतील अनेक उणीवांचा आणि त्रुटींचा फायदा घेऊन आर्थिक सायबर क्राइम तसेच लोकांची ऑनलाइन ओळख चोरून त्यांच्या नावाने आर्थिक गैरव्यवहार करण्याचे प्रकार (आयडेंटीटी थेप्ट) देशात वाढीला लागल्याचे दिसून आले आहे. चालू वर्षात आर्थिक फसवणुकीचे बळी ठरलेल्या लोकांची संख्या गेल्या वर्षाच्या तुलनेत दुप्पट झाल्याचे या सर्वेक्षणात म्हटले आहे.**

### अहवालातील महत्त्वपूर्ण निरीक्षणे

- २०२३ या वर्षात आर्थिक फसवणुकीचे बळी ठरलेल्या लोकांची संख्या गेल्या वर्षाच्या तुलनेत दुप्पट झाल्याचे या अहवालात म्हटले आहे.
- आर्थिक फसवणुकीचा फटका बसणाऱ्या लोकांपैकी ९६ टक्के लोकांना मोबाइल अ‍ॅपमधून बसला फटका.
- आर्थिक फसवणुकीचे सर्वाधिक बळी २७ ते ३७ या वयोगटातील.
- मोबाइल अ‍ॅपचा वाढता वापर, डिजिटल पेमेंट आणि ऑनलाइन आर्थिक फसवणूक यात थेट संबंध.
- ऑनलाइन आर्थिक व्यवहारांच्याबाबत देशातील लोकांची जागृती गरजेची. बँकांचे ४१ टक्के व्यवहार आता होतात अ‍ॅपवरून.
- मोबाइल पेमेंट आता कॅश आणि कार्ड पेमेंटपेक्षाही वाढले.

## कॅशलेस होताना...

**रोकडविरहित व्यवहारांची सोय होण्याऐवजी त्यामुळे ताण वाढतो आहे. कारण यासाठी अतिरिक्त शुल्क द्यावे लागत आहे. लोकांनी अधिकाधिक व्यवहार कॅशलेस करावेत यासाठी सरकारकडून काही सवलतीही देण्यात आल्या आहेत. कॅशलेस व्यवहारात संबंधित व्यक्तीने दिलेली ओळख चोरीला जाण्याची भीती आहे. मग कॅशलेसचे फायदे-तोटे नेमके कोणते आहेत, ते जाणून घेण्याचा हा प्रयत्न...**

### कॅशलेसचे फायदे

- सुविधा : आर्थिक व्यवहार करण्यातील सुलभता हा कॅशलेस होण्यासाठी उद्युक्त करणारा सर्वात मोठा घटक आहे. प्रत्येक व्यवहारासाठी तुम्हाला रोकड घेऊन जाण्याची गरज नाही की एटीएममधून पैसे काढण्यासाठी रांगेत उभे राहण्याचीही गरज नाही. प्रवासात कॅशलेस व्यवहार खूप उपयुक्त ठरतात. तुम्हाला कुठेही व कधीही यामुळे व्यवहार पूर्ण करणे सोपे जाते.





- सवलती : डिजटल प्रणालीने इंधन खरेदी केल्यास त्यावर ०.७५ टक्के सूट, रेल्वे तिकिटे, महामार्गाचा टोल, विमा खरेदी या सर्वांवर देण्यात येणारी सूट हादेखील त्याचाच एक भाग आहे. मोबाइल वॉलेट कंपन्यांनी दिलेल्या सवलती यांची यात भर पडली आहे.
- खर्चाचा मागोवा शक्य : सर्व व्यवहार नोंदवले जात असल्यामुळे खर्चाचा मागोवा घेणे लोकांना खूप सोपे जाणार आहे. याचा उपयोग आयकर विवरणपत्र भरताना तसेच आयकरविषयक चौकशीच्या वेळी होणार आहे. त्याचप्रमाणे महिन्याच्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करतानाही याचा उपयोग लोकांना होणार आहे.
- अंदाजपत्रकाला शिस्त : तुमच्या घरच्या मासिक अंदाजपत्रकाला शिस्त लागणार आहे. मोबाइल अ‍ॅप व टूल्स यामुळे लोकांना त्यांच्या खर्चाची पद्धत पाहणे शक्य होते, ज्यामुळे मागील काही वर्षांतील खर्चाचा आढावाही घेता येतो. खर्च नियंत्रित झाल्यास गुंतवणूक वाढवणे शक्य होते. अनावश्यक खर्चाला आळा घालणेही यामुळे शक्य होते.
- कमी जोखीम : चोरी झाल्यास तुम्हाला तुमचे कार्ड ब्लॉक करता येते किंवा मोबाइल वॉलेट ब्लॉक करता येते. परंतु रोकड चोरीला गेल्यास ती परत मिळणे दुरापास्त असते. याचा फायदा प्रवासादरम्यान होतो.
- छोटे फायदे : जेवढे बिल झाले असले तेवढीच रक्कम तुम्हाला (सुट्या पैशांत बिल झाले असले तरी) भरता येते. त्यामुळे दुकानदारांची सुटे पैसे देण्यातून सुटका होते.

### कॅशलेसचे तोटे

- ओळखचोरीची भीती : कॅशलेस व्यवहारांत ओळखचोरीची सर्वाधिक भीती असते. आपण कॅशलेस व्यवहारांना सरावलेले नसल्यामुळे फिशिंग मेल्सच्या जाळ्यात शिक्षित लोकही अलगद सापडतात. गैरप्रकार झाल्यास त्यावर कारवाई करण्यासाठी प्रभावी यंत्रणा आपल्याकडे नाही.



एखाद्या गरीब रिक्षावाल्याचा आधार क्रमांकच चोरीला गेला तर तो काय करणार? अशावेळी तपास यंत्रणा तोकडी असल्याचा फटका कॅशलेस व्यवहारांना बसू शकतो. याशिवाय बँकांच्या डेटाबेसमधून माहिती चोरीला गेल्यास त्याचाही फटका बसू शकतो.
- फोन हरवणे : कॅशलेस व्यवहारांसाठी केवळ मोबाइल फोनवरच अवलंबून राहणार असाल तर या फोनची चोरी झाल्यास तुम्हाला त्याचा मोठा फटका बसू शकतो. तुम्ही परदेशात असाल किंवा प्रवास करत असला आणि अशी घटना घडली तर त्यामुळे तुमची पंचाईत होऊ शकते. शिवाय तुम्हाला तुमचा फोन सतत चार्ज्ड ठेवावा लागतो. फोनची बॅटरी उतरल्यास तुम्हाला कॅशलेस व्यवहार करता येत नाहीत.
- तंत्रज्ञानाला न सरावलेल्यांसाठी अवघड : देशात केवळ ३४.८ टक्के इंटरनेटचा प्रसार झाला आहे. एकूण मोबाइल वापरकर्त्यांपैकी केवळ २६.३ टक्के लोकांकडे स्मार्टफोन आहेत. डिजिटल होण्यामध्ये मानसिकता न बदलणे ही मोठी समस्या आहे. याचा त्रास ज्येष्ठ नागरिकांना सर्वाधिक होतो.
- अतिखर्च : प्रत्यक्ष रोकड खर्च करावी लागत नसल्याने खर्चात वाढ होऊ शकते. रोकड प्रत्यक्ष बाळगून खर्च करावी लागल्यास हातातून पैसे जात आहेत या कल्पनेनेच खर्चावर नियंत्रण येते. मात्र कार्डांनी किंवा मोबाइल वॉलेटने पैसे द्यावे लागल्यास जवळची रोकड जात नसल्याने अधिक खर्चाची प्रवृत्ती वाढीस लागण्याची भीती असते.




# इंटरनेट बँकिंगची सुविधा


**घरोघरी आज इंटरनेटचा वापर वाढला आहे. त्यामुळे जवळपास सर्वच बँकांनी इंटरनेटद्वारे बँकिंगची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. नेटबँकिंगच्या सुविधेचा वापर करताना आपल्याकडून नजर चुकीने काही त्रुटी राहतात आणि सायबर चोरांकडून हॅकिंगसारखे प्रकार घडून आपणास नाहक मनस्ताप सहन करावा लागतो. त्यामुळे आपण नेटबँकिंग प्रणाली समजून घेऊ. आज सर्वच बँका आपापल्या नेटबँकिंग प्रणालीमध्ये ग्राहकांची व व्यवहाराची सुरक्षा व गोपनीयता राखण्यास प्राधान्य देतात. सर्वसाधारणपणे या सुविधेचा वापर करताना बँक तुमचे दोन गोपनीय पासवर्ड विचारते, म्हणजेच जोवर आपण हे दोन्ही पासवर्ड देत नाही तोवर व्यवहार पूर्ण होत नाहीच. त्याचप्रमाणे काही बँका अजून सुरक्षितता राखण्याच्या दृष्टीने तुमच्या मोबाइलवर पासवर्ड पाठवून व्यवहार तुम्हीच करत आहात ना, याची खात्री करून घेते. सर्वात पहिला व महत्त्वाचा नियम म्हणजे, कुठलीही बँक व बँकेचा प्रतिनिधी फोन, ई-मेल व वैयक्तिकरित्या तुम्हास खात्याबद्दल व पासवर्डबद्दल विचारणा करत नाही. सर्वसाधारणपणे बरेचसे ग्राहक या जाळ्यात फसतात.**

### सुरक्षिततेसाठी काय कराल?

- बँकखात्याची माहिती कुणालाही अगदी बँकेलाही फोन, ई- मेल वा वैयक्तिकरित्या देऊ नका.
- पासवर्ड नियमितपणे दर १५ दिवसांनी बदलत राहा. पासवर्ड अतिशय कठीण पातळीचा ठेवा त्यात, शब्द अंक, विशेष चिन्हांचा वापर करा. बँकेची एसएमएस सुविधा सुरू ठेवा.
- बँकेचे व्यवहार सायबर कॅफेमधून न करता घरातील कम्प्युटरवर करा. बँकेचे संकेतस्थळ नीट पाहून टाइप करा. एचटीटीपीएस दिसत नसल्यास व्यवहार करू नका.

### प्रतिबंधक उपाय...

- सायबर विश्वातील बहुतेक आर्थिक गुन्हे पासवर्ड व लॉग इन आयडी चोरून घडतात. बऱ्याचशा एक्स्पर्ट कम्प्युटर वापरणाऱ्यांनासुद्धा त्यांच्या नकळत पासवर्ड व लॉग इन आयडी चोरला जाऊ शकतो याची नीटशी कल्पना नसते. बँक अशा प्रकारे घडलेल्या गुन्ह्यातील आर्थिक नुकसानीची जबाबदारी घेत नाहीत. काही बँका तुम्हाला दर दोन आठवड्यांनी तुमचा पासवर्ड बदलण्यास भाग पाडतात. हे सायबर गुन्हे टाळण्यासाठी हे महत्त्वाचे आहे.



- आर्थिक व्यवहार करण्यासाठी संस्था अथवा बँका त्यांच्या अधिकृत संकेतस्थळाचा इंटरनेटवरचा पत्ता (यूआरएल) तुम्हाला पाठवते. तो पत्ता जर एचटीटीपी या शब्दाने चालू होत नसेल तर सावधान. एचटीटीपी या शब्दाने चालू होणारे इंटरनेटवरचे सर्व यूआरएल सुरक्षित नसतात. एचटीटीपी पत्ता असणाऱ्या संकेतस्थळावर तुम्ही टाइप केलेला सर्व मजकूर इंटरनेटला जोडलेली कुठलीही व्यक्ती थोड्या प्रयत्नांती वाचू शकते व त्या माहितीचा गैरवापर करू शकते.
- कम्प्युटर सुरक्षेच्यादृष्टीने कुठलीही महत्त्वाची माहिती चॅट करताना टाइप करू नका. उदा : क्रेडिट कार्ड नंबर, पॅनकार्ड नंबर, तुमची जन्मतारीख आदी. तुम्ही जर चॅट करताना मायक्रोफोन व वेब कॅमेरा वापरत असाल तर त्यामार्फत तुम्हाला नकळत तुमच्या हालचाली, फोनवरची बातचित, तुम्ही की-बोर्ड वरची कुठली बटने दाबलीत हे सायबर चोर प्रयत्नांती समजू शकतो. त्या माहितीचा उपयोग करून तुमचा पासवर्ड पण चोरला जाऊ शकतो. यावर सोपा उपाय म्हणून मायक्रोफोन व वेब कॅमेरा काम झाल्यावर बंद करा किंवा झाकून ठेवा.
- सध्या स्पायवेयरचा प्रसार प्रचंड वाढलाय. काही ई-मेल उघडल्यावर लगेचच तुमच्या कम्प्युटरमध्ये स्पायवेयर शिरू शकते. तसेच, काही गेम्स व प्रोग्रॅम्स डाउनलोड करताना पण स्पाय वेयर शिरू शकते. अशा विविध प्रकारांनी स्पाय वेअर तुमच्या नकळत तुमच्या कम्प्युटरमध्ये शिरतात आणि तुम्ही कम्प्युटरवर काय करता याची पूर्ण खबर ठेवतात. तुमची खासगी माहिती, पासवर्ड, कोणते प्रोग्रॅम वापरले, कुठल्या वेबसाइटना भेटी दिल्या ही माहिती सायबरचोरांच्या हाती लागू शकते. दोन किंवा तीन दिवसांनी कम्प्युटरच्या वापरामुळे जमा झालेली तात्पुरती डाउनलोडेड माहिती व जुनी वेब पेजेस कायमस्वरूपी काढून टाकत चला. कम्प्युटर आणि इंटरनेटचे फायदे पाहता कम्प्युटर न वापरणे हा पर्याय नसून काळजी घेतली तर या सायबर चोरांवर मात करणे अजिबात अवघड नाही.

### कसे कराल पैसे ट्रान्सफर?

#### नेटबँकिंगच्या मर्यादा

नेटबँकिंग हा बँकेकडून ग्राहकाला दिलेला आर्थिक व्यवहाराचा कॅशलेस पर्याय आहे. यामुळे कसलाही व्यवहार करण्यासाठी बँकेत जाण्याची गरज नाही. एका दिवसात कोणत्याही बँकेच्या ग्राहकाला एक रुपयापासून ते १० लाखापर्यंत पैसे पाठवता येऊ शकतात. यासाठी कोणताही अधिकचा कर लागत नाही. सध्या नेटबँकिंगचा वापर जवळपास २०० टक्क्यांनी वाढल्याचं बोललं जात आहे. नेट बँकिंग प्रक्रिया सर्व बँकांची थोड्या फार फरकाने सारखीच आहे.



कस्टमर आय.डी. आणि आयपिन मिळाल्यानंतर संबंधित बँकेच्या अधिकृत वेबपेजवर जावे. तिथे पहिल्यांदा कस्टमर आयडी टाकण्याचा पर्याय येईल. कस्टमर आयडी टाकल्यानंतर आयपिन टाकण्याचा पर्याय येईल. लॉग इन केल्यानंतर पहिल्यांदा खात्याचा तपशील दाखवला जाईल. बाजूलाच फंड ट्रान्सफर हा पर्याय दिलेला आहे. पैसे ट्रान्सफर करण्यासाठी ज्यांना पैसे पाठवायचे आहेत, त्यांच्या बँकेचा आयएफएससी कोड, बँक खाते नंबर आवश्यक आहे. पैसे ट्रान्सफर करण्यासाठी अगोदर बेनिफिशिअरी क्रमांक म्हणजे ज्यांना पैसे पाठवायचे आहेत, त्यांचा तपशील तयार करणं गरजेचं आहे. फंड ट्रान्सफरमध्ये गेल्यानंतर बाजूलाच रिक्वेस्ट हा पर्याय आहे. त्यावर क्लिक केल्यानंतर अ‍ॅड बेनिफिशिअरी हा पर्याय दिसेल. त्यामध्ये ज्यांना पैसे पाठवायचे त्यांचा आयएफएससी कोड, खाते क्रमांक ही माहिती दिल्यानंतर पुढील स्टेपमध्ये जावे. खाते क्रमांक, आयएफएससी कोड टाकून पुढे गेल्यानंतर कन्फर्म करण्यापूर्वी तुमच्या रजिस्टर केलेल्या मोबाईल क्रमांकावर ओटीपी येईल. तो ओटीपी टाकून बेनिफिशिअरी तयार करावं. बेनिफिशिअरी तयार केल्यानंतर सरासरी ३० मिनिटांनंतर तुम्ही पैसे पाठवू शकता. ३० मिनिटांनंतर इतर बँकांना पैसे पाठवता येतील. त्याच बँकेच्या ग्राहकाला पैसे पाठवायचे असतील तर ट्रान्सफर विदिन बँक हा पर्याय निवडावा किंवा इतर बँकेच्या ग्राहकाला पैसे ट्रान्सफर करायचे असतील तर ट्रान्सफर टू ऑदर बँक हा पर्याय निवडावा. त्याच बँकेच्या ग्राहकालाच पैसे पाठवायचे असतील तर तीन स्टेपमध्ये पैसे पाठवता येतात. पहिल्या स्टेपमध्ये तुम्हाला सेव्हिंग किंवा करंट अकाऊंटमधून पैसे पाठवायचे आहेत, तो पर्याय निवडावा. त्यानंतर ट्रान्सफर नाऊ हा पर्याय निवडून तुम्ही अ‍ॅड केलेल्या बेनिफिशिअरीचा क्रमांक निवडावा. जेवढे पैसे पाठवायचे आहेत ती रक्कम टाकावी. त्यानंतर कन्फर्म करावं. कन्फर्म केल्यानंतर तुम्हाला खात्याशी कनेक्टेड मोबाईल क्रमांकावर ओटीपी येईल. ओटीपी टाकल्यानंतर काही क्षणात पैसे ट्रान्सफर होतील.

#### या चुका करू नका...

कोणत्याही व्यक्तीसोबत आपला अकाउंट पासवर्ड शेअर करू नका. कोणत्याही अज्ञात लिंक किंवा अटॅचमेंटला ओपन करू नका. ऑनलाइन बँकिंगचा वापर केल्यानंतर त्याचे लॉगइन तसेच ठेवू नका. नेहमी लॉगआउट जरूर करा. आपली पर्सनल यूएसबी किंवा हार्ड डिस्कचा वापर कोणत्याही अन्य दुसऱ्या लॅपटॉप किंवा कम्प्युटरवरून करू नका. सोशल मीडियावर कधीही आपली जन्मतारीख, पत्ता, फोन नंबर यासारखी माहिती उघड करू नका. यावरून ऑनलाइन फ्रॉड होऊ शकतो.

## शॉर्ट न्यूज

### शेतकऱ्यांच्या खात्यावर दुष्काळी अनुदान जमा करा

**शेवगाव :** तालुक्यातील शेतकऱ्यांच्या खात्यावर दुष्काळी अनुदान जमा करावे, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रय फुंदे यांनी केली आहे. याबाबत महसूलमंत्री व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना देण्यात आले. याबाबत तातडीने निर्णय घेऊन शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये दुष्काळी अनुदान जमा करावे. याबाबत तातडीने उपाययोजना न झाल्यास दि. २५ जूनपासून गावोगावी साखळी उपोषण करण्याचा इशारा फुंदे यांनी दिला आहे.

### शिक्षक निवडणुकीसाठी जिल्ह्यात २० मतदान केंद्रे

**नगर :** विधान परिषदेच्या नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी नगर जिल्ह्यात २० मतदान केंद्रे तयार करण्यात आली आहेत. संगमनेरमध्ये सर्वाधिक ३ केंद्रे आहेत. मतदान केंद्राध्यक्षांसह सूक्ष्म निरीक्षक, सहायक, फिरत्या पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्ह्यातील एकूण १७ हजार ४४१ मतदारांपैकी संगमनेर, राहाता, नगर व कोपरगाव या चार तालुक्यांतच निम्मे मतदार नोंदवले गेले आहेत. शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी नगर जिल्ह्यात २० मतदान केंद्र आहेत.

### संभाजी ब्रिगेडचा रक्ताभिषेक आंदोलनाचा इशारा

**श्रीगोंदा :** येथील छत्रपती संभाजी महाराज स्मारकासाठी प्रस्तावित सरकारी जागेत असलेले खासगी अतिक्रमण काढण्यास महसूल प्रशासन जाणीवपूर्वक टाळाटाळ करत असल्याने प्रलंबित छत्रपती संभाजी महाराज स्मारक उभारण्यासाठी प्रशासनाने सदर जागेवरील अतिक्रमण हटविण्याची मागणी करत अतिक्रमण हटविले नाही तर मंगळवारी (ता. १८) छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेला रक्ताचा अभिषेक आंदोलन करणार असल्याची माहिती संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष अरविंद कापसे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

### गुन्हेगारांची टोळी २४ तासांत अटक

**नेवासा :** तालुक्यातील माका परिसरातून शेती साहित्य चोरणाऱ्या गुन्हेगारांना सोनई पोलिसांनी अवघ्या चोवीस तासांत जेरबंद केले. त्यांच्याकडून चोरीस गेलेला मुद्देमालही हस्तगत करण्यात आला. नेवासा तालुक्यातील माका येथील शेतकरी सुदाम गिरीधर पालवे यांच्या शेतातून इलेक्ट्रीक पंप, जनरेटर, केबल, ग्रियुज लॉम्बॉर्डींग कंपनीचे ५ एचपीचे मशिन असे शेती उपयोगी साहित्य कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेले होते. याप्रकरणी सोनई पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. दोघा संशयितांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता गुन्ह्याची कबुली दिली.

### अंकलेश्वरमधून आठ दिवसांपासून तरूण बेपत्ता

**संगमनेर :** उपनगरातील मालदाड रोडवरील रहिवासी असलेला तरुण महेश अरुण पडघलमल (वय ३४ वर्षे) हा गाडीवर क्लीनर म्हणून गुजरातमध्ये गेला. तो अंकलेश्वर येथून बेपत्ता झाल्याची माहिती समोर आली आहे. असून त्याच्या कुटुंबीयांनी अंकलेश्वर आहे. सात दिवसांचा कालावधी उलटून देखील अद्याप त्याचा शोध लागलेला नाही. महेश पडघलमल हा सोमनाथ माधव सातपुते याच्याबरोबर ३ जूनला गुजरातच्या अंकलेश्वर येथे गेला होता. मात्र पाच तारखेला तो बेपत्ता झाल्याची माहिती सोमनाथ सातपुते यांनी महेश पडघलमल याच्या घरी दूरध्वनी करून कळविली होती. याप्रकरणी अंकलेश्वर पोलीस ठाण्यात तरुण बेपत्ता असल्याची नोंद करण्यात आली आहे. पराभवानंतर

# पराभवानंतर नवनीत राणा पहिल्यांदाच भडाभडा बोलल्या

## प्रत्येक प्रश्नाला दिले सडेतोड उत्तर

**अमरावती : प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीत प्रहारचे आमदार बच्चू कडू यांनी आपल्या पक्षाचा उमेदवार उभा केला होता. त्याचा फायदा काँग्रेसचे उमेदवार बळवंत वानखेडे यांना झाला. बच्चू कडू यांच्याबाबत नवनीत राणा यांना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी एका वाक्यात उत्तर दिले.**



माजी खासदार नवनीत राणा यांनी आज अखेर माध्यमांसमोर येत सध्याच्या विविध राजकीय घडामोडींवर प्रतिक्रीया दिली. नवनीत राणा या अमरावती लोकसभा मतदारसंघात भाजपच्या तिकीटावर उभ्या होत्या. पण तिथे त्यांचा पराभव झाला. त्यांनी आपल्या पराभवावरही प्रतिक्रिया दिली. ''मी माझ्या क्षेत्रासाठी ज्या पद्धतीने काम केले त्यानंतर मला कळले नाही की यंदा जनतेने मला का थांबवले?'', असे नवनीत राणा म्हणाल्या. यावेळी नवनीत राणा यांना विधानसभा निवडणुकीत आमदारकीसाठी उभं राहणार का? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी ''राज्यात काम करायचे की कुठे हे ठरविले नाही'', अशी प्रतिक्रिया दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शपथविधीच्या कार्यक्रमासाठी आपण दिल्लीला गेला होता का? असा प्रश्न पत्रकारांनी नवनीत राणा यांना विचारलं. त्यावर त्यांनी ''पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची शपथ होती. मी भाजपची कार्यकर्ता आहे. त्यामुळे दिल्लीत जाणे काहीही गैर नाही. यापूर्वीही पाच वर्ष दिल्लीत होती. पराभूत होऊनही आम्ही जिंकलो आहोत. कारण आमचे मोदी पंतप्रधान झाले आहेत'', अशी भूमिका मांडली. ''मोदी एकटे लढले, त्यांना पराभूत करण्यासाठी अनेक लोकं झुंड बनवून त्यांना रोखत होते'', असं नवनीत राणा म्हणाल्या.

**नवनीत राणा यांचा बच्चू कडू यांना टोला**

अमरावती लोकसभा निवडणुकीत प्रहारचे आमदार बच्चू कडू यांनी आपल्या पक्षाचा उमेदवार उभा केला होता. त्याचा फायदा काँग्रेसचे उमेदवार बळवंत वानखेडे यांना झाला. बच्चू कडू यांच्याबाबत नवनीत राणा यांना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी एका वाक्यात उत्तर दिलं. ''काही लोकं मैदान जिंकण्यासाठी येतात, तर काही लोकं दुसऱ्यांना पराभूत करण्यासाठी येतात'', असं नवनीत राणा म्हणाल्या. ''अमरावती आमच्या नेत्यांना माहित आहे की काय घडले. आम्ही कार्यकर्त्यांना त्यांना सांगायची गरज नाही'', असंदेखील नवनीत राणा म्हणाल्या.

**'तर मी एससी आणि एसटीचे समाजासोबात उभी राहीन'**

''एससी आणि एसटीचे आरक्षण काढून दुसऱ्या समाजाला आरक्षण दिले जाणार असेल, तर मी एससी आणि एसटीचे समाजासोबात उभी राहीन'', असं नवनीत राणा म्हणाल्या. ''एससी आणि एसटी समाजातील लोकांना उद्देशून खोट्या स्वरूपात संविधान बदलले जाईल असा प्रचार केला. लवकरच एससी आणि एसटी समाजाला या खोट्या प्रचाराची जाणीव होईल'', असा दावा नवनीत राणा यांनी केला.

**नवनीत राणा यांची ठाकरेंवर टीका**

नवनीत राणा यांनी यावेळी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत यांच्यावरही टीका केली. ''उद्धव ठाकरे यांचा पोपट बोलत होता की आम्ही शपथ घेऊ आणि मोदींना निमंत्रित करू. पण सर्वांनी पाहिले मोदींनी शपथ घेतली. शेर आखिर शेर ही होता है. उद्धव ठाकरे यांनी सुद्धा मी पराभूत झाली म्हणून आता तरी हनुमान चालीसा पठण केलं पाहिजे'', अशी टीका नवनीत राणा यांनी केली.

(पान १ वरून)

### राष्ट्रवादीच्या वाट्याचे राज्यमंत्रीपद कुणाला मिळणार?

मात्र आता बारामतीत विधानसभेला नवे दादा उभा राहू पाहत आहेत. त्याबाबत सुनेत्रा पवार यांना प्रश्न विचारण्यात आला त्यावर त्या म्हणाल्या की, राजकारणात प्रत्येकाला काही ना काही इच्छा असतात. अशा इच्छा कुणी व्यक्त केल्या असतील तर त्याला माझी काही हरकत नाही. लोकशाहीत प्रत्येकाची वेगवेगळी मते असू शकतात.

# भाजप खरंच विधानसभा स्वबळावर लढणार?

## अजित पवारांना दूर ठेवण्यासाठी सर्वे?

**मुंबई : प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणूक २०२४ नंतर महाराष्ट्रात राजकीय उलथा-पालथ झाली आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी राजकीय भूकंप होणार असल्याची देखील राजकीय वर्तुळात रंगली आहे. एकनाथ शिंदे-अजित पवार सोबत असताना देखील राज्यात महायुतीला यश मिळाले नाही. त्यामुळे भाजप आता पराभवाचे विश्लेषण करत आहे. भाजप विधानसभा स्वबळावर लढणार अशी देखील चर्चा आहे.**



मित्रपक्ष सोबत असताना देखील मिळालेल्या अपयशानंतर भाजप पक्षांतर्गत एक सर्वे करत असल्याची माहिती आहे. उत्तर प्रदेशनंतर महाराष्ट्रात लोकसभेच्या जागा सर्वाधिक आहेत. उत्तर प्रदेशात ८० तर महाराष्ट्रात ४८ जागा आहेत. महाराष्ट्रात भाजपला फक्त ९ जागांवर विजय मिळाला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुखपत्रात अजित पवार यांना भाजपने सोबत घेतल्यामुळे नाराजी व्यक्त केली. बहुमत असताना अजित पवार यांना सोबत का घेतले, असा सवाल देखील मुखपत्रात उपस्थित करण्यात आला. याच पार्श्वभूमीवर भाजप अंतर्गत सर्वे करत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे भाजप विधानसभा स्वबळावर लढणार का?, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. राज्यात विधानसभा निवडणुका जवळ आल्या आहेत. त्यामुळे सर्व पक्ष रणनीती बनवण्यात व्यस्त आहेत. शिवसेना उद्धव ठाकरे गटाने २८८ विधानसभांमधील संपर्कप्रमुखांची बैठक घेतली. आता भाजपने विधानसभांचे सर्वेक्षण सुरु केले आहे. आतापर्यंत भाजपने अजित पवार यांना सोडण्याचा कोणताही निर्णय घेतला नाही. पण भाजप सध्याची परिस्थिती लक्षात घेता स्वबळावर निवडणूक लढवणार का, याचा अंदाज घेत आहे. इतर १८२ विधानसभा मतदारसंघातही भाजप सर्वेक्षण करणार आहे. महाराष्ट्रात विधानसभेच्या एकूण २८८ जागा आहेत. सरकार स्थापन करण्यासाठी १४५ जागांची आवश्यकता आहे.

**अधिकृत माहिती काय?**

एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेशी युती करून भाजपची कामगिरी कशी असेल, राष्ट्रवादीसोबतची आघाडी कायम राहायची की नाही, असे प्रश्न सर्वेक्षणात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती. मात्र भाजपचे प्रदेश सह मुख्य प्रवक्ते अजित चव्हाण यांनी ही चर्चा फेटाळली आहे. ह्या विरोधकांनी पेरलेल्या बातम्या असल्याचे अजित चव्हाण म्हणाले.
आज पक्षांच्या वरिष्ठांच्या बैठका झाल्या देवेंद्र फडणवीस देखील होती. असा कुठलाही विचार भाजपच्या मनात नाही. महायुती म्हणून आम्ही विधानसभा निवडणुकीला सामोरे जाणार आहोत. हा संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. काँग्रेस आणि सर्व विरोधी पक्षांमध्ये विस्तव जात नाही आहे. बातम्या सोडायची मर्यादा असते. विरोधकांनी बातम्या पेरायच्या आणि आम्ही त्याला उत्तर देत फिरायचं हे अजिबात चालणार नाही, असे अजित चव्हाण यांनी स्पष्ट शब्दात

**भाजपचा वोट शेअर वाढला**

विरोधकांकडून अशा बातम्या सोडण्याचे काम होते. त्यांचे ते कामच आहे. मात्र असं काही नाही. सुनेत्रा पवार बिनविरोध निवडून गेल्या राज्यसभेवर, त्या गेल्या असत्या का? राज्यसभेवर खासदार म्हणजे मोठी गोष्ट आहे, असे देखील चव्हाण म्हणाले.
अजित चव्हाण म्हणाले, सध्या राज्यात भाजपचा वोट शेअर वाढला आहे. ज्याला डेस्टींगशन मिळतं त्याला फर्स्ट क्लासपेक्षा जरा जास्त मार्क मिळाले आणि नापास होणाऱ्या माणसाला ४१ टक्के मिळाले त्याचा ते आनंद व्यक्त करायत, ज्याची त्याची पाहण्याची दृष्टी असते. आम्ही थोडेसे कमी झालो तरी आत्मपरिक्षण करतो.

### साहित्य अकादमीचा पुरस्कार भारत सासणे यांच्या कादंबरीला जाहीर

निर्माण केलेल्या पात्राच्या माध्यमातून किशोरवयीन मुलांना बुद्धिचातुर्य कथा सांगण्याचा प्रयत्न मी 'समशेर आणि भुतबंगला' कादंबरीतून केला आहे. या पुरस्काराच्या माध्यमातून कादंबरीतील हे पात्र रूजले आहे, याचाही आनंद आहे. या कादंबरीतील काही भाग 'साधना'च्या अंकात प्रकाशित झाले आहेत. विशेष म्हणजे साधना अंकासाठीच काही भाग लिहिले आहेत.

**भारत सासणे**
ज्येष्ठ साहित्यिक

### ''मराठा समाजामध्ये भाजपाबद्दल असंतोष''

उच्च न्यायालयात, सर्वोच्च न्यायालयात टिकवलं. ते गेलं उद्धव ठाकरेंच्या काळात. पुन्हा मिळवलं एकनाथ शिंदेंच्या काळात. तरी मराठा समाजाचा रोष आहे? यासाठी आम्ही विचारमंथन केले. त्यातून आणखी काही गोष्टी करण्याचे मुद्दे आले'', असे ते म्हणाले. ''निवडून येण्यासाठी जी मतं लागतात, ती न मिळण्यामागच्या अनेक कारणांमध्ये हे एक कारण आहे की मराठा समाजाला ज्या सुविधा दिल्या, आरक्षण दिलं त्या गोष्टी त्यांच्यापर्यंत पोहोचवून त्यांना एकत्र सोबत घेऊ शकलो नाही'', असेही त्यांनी नमूद केले.

ADMISSIONS
OPEN 2024-25
प्रवेश सुरू
२०२४-२५
PARNER PUBLIC SCHOOL
LKG, UKG, STD 1st
State Board
11th Science (State Board & NCERT Syllabus)
Integrated with NEET & MHT-CET
MHT-CET (Engg., NATA, Architecture, NDA, Other Entrance)
NEET (Medical, Agri, Pharmacy, Other Entrance)
G. M. INTERNATIONAL SCHOOL
LKG, UKG, STD 1st to 5th
CBSE Board

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2
डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
गर्भपिशवीचे आजार
- अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
स्तनांचे आजार आणि उपचार
PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच
मेजर भगवान नांगरे सर
* आमची वैशिष्ट्ये *
* १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
* एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
* प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
* मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
* अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
* PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
* पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
* ॲडमिशन ओपन *
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# हंग्यात पाचवीच्या विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

## शिरा, सांबर, भाताची मेजवानी




■ हंगे येथील रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कुलमध्ये इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांचे मोठया उत्साहात स्वागत करण्यात आले.

### प्रभात फेरी आणि मेजवानी

**नव्याने दाखल झालेल्या पाचवीच्या विद्यार्थ्यांची ढोल ताशांच्या गजरात गावातून मिरवणूक काढण्यात आली. शाळेमध्ये स्वागत करण्यात आल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना शिरा, सांबर, भात अशा स्नेहभोजनाची मेजवानी देण्यात आली.**

### गुणवंतांचा सन्मान आणि नवगतांचे स्वागत

**या विद्यालयाचा दहावी सेमी इंग्रजी माध्यमाचा निकाल १०० टक्के तर मराठी माध्यमाचा निकाल ९१.८० टक्के लागला. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. तर नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प, भेट वस्तू, पाठयपुस्तके देऊन स्वागत करण्यात आले.**

हंगे : प्रतिनिधी

**खासदार नीलेश लंके यांच्या हंगे गावातील रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कुलमध्ये ढोल ताशांच्या गजरात इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.**

नगर लोकसभा मतदारसंघाचे खासदार तसेच रयतच्या जनरल बॉडीचे सदस्य नीलेश लंके यांच्या गावामध्ये नव्या शैक्षणिक वर्षाचे स्वागत जल्लोषात करण्यात आले. पाचवीच्या विद्यार्थ्यांच्या स्वागताबरोबरच पाचवी ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठयपुस्तकांचे वितरणही करण्यात आले.

सरपंच राजेंद्र शिंदे, पोपटराव इथापे, मनोहर दळवी, डॉ. सुदर्शन धस यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून नव्या शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी उपसरपंच सुरेश रासकर, ज्ञानदेव लंके, दीपकशेठ लंके, राजेंद्र दळवी, बाळासाहेब शिंदे, बाळासाहेब दळवी, जगदीप साठे, माया गणेश साळवे, प स सोंडकर, चेअमन दळवी महाराज, स्कुल कमिटीचे सदस्य पोपटराव इथापे, मनोहर दळवी, बाबा नवले, प्रभारी मुख्याध्यापक डॉ. सुदर्शन धस, शिक्षण प्रेमी ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते. संदीप शिंदे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन तर राजेंद्र टापरे यांनी आभार मानले.

विद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख शोभा भालेराव, राजेंद्र टापरे,संदीप शिंदे, अनिल खांदवे, रमेश दरेकर, रोहिदास भालेराव, भारती म्हस्के, सुवर्णा भोर, जयश्री क्षीरसागर, राजश्री धात्रक, ज्योती बांडे, कल्पना चौधरी, जयसिंग खोडदे, रावसाहेब पायमोडे, संतोष पवार यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परीश्रम घेतले.

# वसंत कवाद यांचे विविध क्षेत्रात संघटन महत्वपूर्ण

## खासदार नीलेश लंके यांचे गौरोद्गार

निघोज : प्रतिनिधी

**बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष वसंत कवाद यांनी गेली पाच वर्षात निघोज पतसंस्था तसेच इतर सहकारी पतसंस्था तसेच सामाजिक व धार्मिक कार्यात सातत्याने सहभागी होऊन मोठ्या प्रमाणात संघटन केले असून यासाठी निघोज व परिसरातील युवकांची व ज्येष्ठ मंडळींनी मोठ्या प्रमाणात साथ दिली असून निघोजचा विकासाभिमुख चेहरा कायम राहण्यासाठी व विकासाचा आलेख उंचावण्यासाठी आपण खासदार निधीतून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देणार असल्याची ग्वाही खासदार नीलेश लंके यांनी दिली आहे.**

बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे संचालक, बाबासाहेब कवाद ग्रामविकास सेवाभावी संस्था, निघोज परिसर कृषी फलोद्यान संस्थेचे संचालक, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट पदाधिकारी व विश्वस्त मंडळ, ग्रामपंचायत सदस्य तसेच निघोज सोसायटीचे संचालक मंडळ तसेच ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ यांनी हंगा येथे जाऊन खासदार नीलेश लंके यांचा सत्कार केला यावेळी ते बोलत होते.



यामध्ये प्रामुख्याने बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष व मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे उपाध्यक्ष वसंत कवाद, पतसंस्थेचे उपाध्यक्ष नामदेवराव थोरात, ट्रस्टचे कोषाध्यक्ष व मळगंगा कंट्रक्शनचे संस्थापक अध्यक्ष तसेच निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्थेचे उपाध्यक्ष अमृताशेठ रसाळ, आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेतृत्व रुपेश ढवण, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका कार्याध्यक्ष सोमनाथ वरखडे, माजी सरपंच ठकाराम लंके, निघोज सोसायटीचे उपाध्यक्ष शांताराम लाळगे, माजी उपाध्यक्ष वसंतराव ढवण, ट्रस्टचे सहसचिव विश्वास शेटे, विश्वस्त ज्ञानेश्वर लंके, विठ्ठलराव कवाद, ॲड . रामदास लामखडे, ग्रामपंचायत सदस्य गणेश कवाद, दिगंबर लाळगे, शंकर गुंड, अण्णाभाऊ साठे प्रतिष्ठानचे अध्यक्ष सतिष साळवे, सोसायटीचे संचालक शांताराम कवाद, अंकुश लोखंडे, दत्तात्रय लंके, सामाजिक कार्यकर्ते गोविंद लामखडे, पतसंस्थेचे संचालक भिवा रसाळ, भाऊ रसाळ, श्रीकांत लामखडे, नीलेश लामखडे दिलीप लाळगे, जय मल्हार देवस्थान ट्रस्टचे सचिव सचिन लंके तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी व संचालक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खासदार लंके यावेळी म्हणाले विधानसभा व लोकसभा निवडणुकीत निघोज - अळकुटी जिल्हा परिषद गटाने यामध्ये प्रामुख्याने निघोज गावाने मला सर्वाधिक मताधिक्य दिले आहे. हंगा माझी जन्मभूमी असली तरी निघोज माझी कर्मभूमी आहे. विधानसभा सदस्य म्हणून मतदारसंघ व लोकसभा निवडणूक माध्यमातून संपूर्ण जिल्हा माझी कर्मभूमी झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या कृपेने आणि जनतेच्या आशिर्वादाने आपण खासदार झालो आहोत.

जिल्ह्यातील प्रश्न संसदेत मांडण्याची मोठी संधी मिळाली असून खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली आपण राज्यातील शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याची भूमिका आपण घेणार आहोत. आपल्या माध्यमातून पारनेर सारख्या दुष्काळी तालुक्याला खासदार होण्याची संधी मिळाली याची जाण आपल्याला असून जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळेल अशीच कामगिरी आपण करणार असून लवकरच राज्याचे जागृत देवस्थान मळगंगा देवीचा आशीर्वाद घेऊनच आपण संसदेत जाणार असून जनतेच्या प्रश्नांना योग्य न्याय मिळेल ही जनतेची अपेक्षा पुर्ती करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

# बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी सरपंच ठुबे यांचा पुढाकार

## कान्हूरपठार येथे बियाणे, औषधांचे वितरण



■ कृषि विभागामार्फत कान्हूरपठार येथील शेतकऱ्यांना सरपंच संध्या ठुबे, मंडलाधिकारी जालिंदर गांगर्डे यांच्या उपस्थितीत बियाणे तसेच औषधांचे वितरण करण्यात आले. (छाया : श्रीकांत ठुबे)

कान्हूरपठार : प्रतिनिधी

**शेतीमधील खरीप हंगामाच्या पार्श्वभुमीवर जास्तीत जास्त शेतकऱ्यांना कृषि विभागामार्फत बियाये व औषधे उपलब्ध करून देण्यासाठी कान्हूरपठारच्या सरपंच संध्या किरण ठुबे यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या उपस्थितीत कृषि विभागामार्फत दिडशे शेतकऱ्यांना पाच किलो मुग बियाणे तसेच औषधांचे वितरण करण्यात आले.**

यावेळी बोलताना मंडल अधिकारी जालिंदर गांगर्डे म्हणाले, राज्य शासनाच्या खरीप हंगाम पूर्व तयारी कार्यक्रमांतर्गत शेतक-यांचे उत्पादन वाढावे या हेतूने बियाणे व औषधांच वितरण करण्यात येते. मुगाचे बियाणे महाबीज कंपनीच्या उत्कर्ष जातीचे असून ते तीन वर्षे पेरणीसाठी वापरले जाउ शकते. शेतकऱ्यांना किड नियंत्रण, माती परीक्षण, उगवण क्षमता चाचणी याबाबत कृषि विभागामार्फत वेळोवेळी मार्गदर्शन करण्याचे नियोजनही करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. या योजनेचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांना लाभ व्हावा यासाठी सरपंच संध्या ठुबे यांनी पाठपुरावा केल्याचे गांगर्डे यांनी आवर्जुन सांगितले.

याप्रसंगी कृषि सहाय्यक एम.एस.बोरूडे, अजित क्षिरसागर, सरपंच संध्या ठुबे, वीज वितरण कमिटीचे अध्यक्ष चंद्रभान ठुबे, ग्रामपंचायतीचे सदस्य श्रीकांत ठुबे, गणेश तांबे, बाबा गायखे, बी.एल.ठुबे, शिवाजी शेळके, अंजना भालेकर, सुरेश गुमटकर, महेश गायकवाड, संदीप ठुबे, अर्जुन चत्तर, सुनील गायकवाड, बाजीराव नवले, संपत शेळके, किसन नवले, दशरथ ठुबे, संतोष भागवत, गोकुळ ठुबे, सुभाष शिंदे, दिलबाज ठुबे, शिवाजी तांबे, पिराजी ठुबे, केतन वाघुंडे, मच्छिंद्र नवले आदी मान्यवर व शेतकरी उपस्थित होते.

### अनुदानावर बियाणे

**ज्या शेतकऱ्यांनी कृषि विभागामार्फत ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केलेले आहेत, त्यांना फुले संगमचे तीस किलोचे सोयाबीन बियाणे १ हजार ८०० रूपये अनुदानावर मिळणार आहे.**

जालिंदर गांगर्डे
मंडलाधिकारी

# रस्त्यावर आडवे झालेले झाड चार दिवसानंतर हटविले !

## बांधकाम विभागाला अखेर जाग आली



■ शिरूर-बेल्हे रस्त्यावर कोहकडी शिवरात वादळी वाऱ्यामुळे रस्त्यावर आडवे झालेले झाड चार दिवसानंतर हटविण्यात आले. (छाया : चंद्रकांत कदम )

कोहकडी : प्रतिनिधी

**शिरूर-बेल्हे या रस्त्यावर कोहकडी शिवारात वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे आडवे झालेले झाड अखेर चार दिवसानंतर हटविण्यात आले. सार्वजनिक बांधकाम विभागाला उशिरा का होईना जाग आल्याच्या उपरोधीक भावना वाहनचालकांकडून व्यक्त होत आहेत.**

राज्यात मान्सून सक्रीय झाल्यानंतर पारनेर तालुक्याच्या अनेक भागात तो मुसळधार बरसत असून वादळी वाऱ्यासह अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडलेली आहे. अशाच वादळी पावसामुळे शिरूर-बेल्हे रस्त्यावर कोहकडी शिवारात एक झाड उन्मळून रस्त्यावर आडवे झाले. या झाडामुळे वाहतूकीस मोठा अडथळा निर्माण होत होता. त्यातून एखादा अपघात होण्याची चिन्हेही होती. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे त्याबाबत तक्रारही करण्यात आली मात्र त्याकडे डोळेझाक करण्यात येत होती. या झाडामुळे अपघात होउन एखाद्याचा जीव गेल्यानंतर हे झाड हटविणार का असा सवाल वाहनचालकांकडून व्यक्त करण्यात येत होता.

पुणे जिल्हयातून संगमनेर, कल्याण, आळेफाटा, ठाणे, नाशिककडे जाणाऱ्या वाहनांची या मार्गावर नेहमीच वर्दळ असते. अशातच पाऊस सुरू झाल्यानंतर कोहकडी शिवारातील हमालवाडी परिसरात रस्त्यावर झाड कोसळले. झाड कोसळल्यामुळे रहदारीच्या या रस्त्यावर वाहतूकीची कोंडी होऊ लागली. वर्दळीचा रस्ता असल्याने सार्वजनीक बांधकाम विभाग त्याची दखल घेऊन झाड तातडीने हटविले जाईल अशी अपेक्षा होती. मात्र ती चार दिवस तरी फोल ठरली. अखेर नागरीकांच्या तक्रारी वाढल्यानंतर बांधकाम विभागाला जाग आली आणि ते झाड हटविण्यात आले.

# निघोजच्या शाळेत गुलाबपुष्पाने विद्यार्थ्यांचे स्वागत

## मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप

निघोज : प्रतिनिधी

**निघोज येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे जोरदार स्वागत झाले असून शिक्षकांनी गुलाबपुष्प तसेच राज्य सरकार शैक्षणिक विभागाच्या मोफत पुस्तक योजनेनुसार विद्यार्थ्यांना पुस्तके देण्यात आली.**



यावेळी मुख्याध्यापक कैलास शिंदे, सुभाष मगर, काळे सर, दिघे मॅडम, सालके मॅडम , स्वरांजली केक्स निघोज या गृहउद्योगाच्या अध्यक्षा सरला रोहन उनवणे आदी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मुख्याध्यापक कैलास शिंदे म्हणाले जिल्हा परिषद मराठी शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना चांगल्याप्रकारे शिक्षण मिळत असल्याने निघोज आणि परिसरातील जिल्हा परिषद शाळेचा विद्यार्थी पट सातत्याने वाढता असून सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना याचा मोठा फायदा होत आहे. शैक्षणिक संस्कृतीला निघोज आणी परिसरात चालना देण्याचे काम पालक वर्गातून सातत्याने होत असल्याने मराठी शाळांना काही अडचणी आल्यास त्या अडचणींवर मात करण्याचे काम सातत्याने होत असते. शिक्षकांना सहकार्य करण्याचे धोरण ग्रामस्थ व विविध संस्थांचे पदाधिकारी यांचेकडून होत असल्याने शैक्षणिक कार्यासाठी मोठे योगदान मिळत आहे.

जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळेतील शिक्षक अतिशय काळजी घेऊन काम करतात यासाठी पालकांनी इयत्ता पहिलीसाठी विद्यार्थ्यांनी या ठिकाणी प्रवेश घेण्याचे आवाहन मुख्याध्यापक शिंदे यांनी केले आहे.

### जिल्हा परिषद मराठी शाळेतील

**उच्च विद्या विभूषित शिक्षक अतिशय चांगल्या पद्धतीने विद्यार्थ्यांना शिकवीत असून शाळेचा शैक्षणिक स्तर उंचावलेला आहे. निघोज आणि परिसरातील सर्व जिल्हा परिषद मराठी शाळांचा शैक्षणिक नावलौकिक मोठा असून या ठिकाणी पहीली ते चौथी पर्यंत असलेल्या मंथन व इतर स्पर्धा परिक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली असून शाळांची कामगिरी उत्कृष्ट आहे.**

सरला रोहन उनवणे
स्वरांजली केक्स निघोज

# विजेच्या तारांचा शॉक लागून शेतकऱ्याचा मृत्यू

## पावसात दोन विद्युत पोल पडूनही दुर्लक्ष

श्रीगोंदा : प्रतिनिधी

**पावसात पडलेल्या विद्युत पोलच्या तारांमध्ये चालू असलेल्या विद्युत प्रवाहामुळे एका शेतकऱ्यासह दोन शेळ्या जागीच ठार झाल्याची घटना श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी येथील वाळके वस्ती परिसरात घडली. या घटनेने बेलवंडी परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या घटनेला जबाबदार असलेल्या वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.**



या घटनेत संभाजी किसन वाळके हे शेतकरी जागीच गतप्राण झाले. बेलवंडी गावातील वाळकेवस्ती येथील शेतकरी संभाजी किसन वाळके हे शेळ्या घेऊन नदीच्या कडेला घेऊन गेले होते. नदीच्या कडेला असलेल्या शेतात दोन विद्युत पोल बुधवारी (ता.१२) रात्रीच्या पावसात पडले होते.

विजेचे पोल पडून सुमारे १८ तास उलटले तरी देखील त्यातील विद्युत पुरवठा चालू होता. दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास शेळ्या चरत असताना त्या तारेजवळ गेल्या आणि त्यांना विद्युत शॉक लागला. यावेळी शेळ्या घेऊन गेलेले संभाजी वाळके यांनी शेळ्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला असता त्यांना शेतातील साचलेल्या पाण्यात पडलेल्या विजेच्या तारामुळे शॉक लागला. विजेच्या तीव्र धक्क्याने संभाजी वाळके हे जागीच मयत झाले. ही बाब नातेवाईकांच्या लक्षात आल्याने त्यांनी तात्काळ जवळच असणाऱ्या विद्युत ट्रान्सफार्मरचा विद्युत पुरवठा खंडित केला. परंतु तोपर्यंत दोन शेळ्या आणि संभाजी वाळके जागीच गतप्राण झाले होते. घटनेची माहिती समजताच घटनास्थळी बेलवंडी पोलीस ठाण्याचे कर्मचारी कैलास शिपणकर, नंदकुमार पठारे यांनी भेट देऊन पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदन करत रात्री उशिरा मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# ढोलताशांच्या गजरात नवविद्यार्थ्यांचे स्वागत

## ■ सद्गुरू ओंकारबाबा माध्यमिक विद्यालयाचा उपक्रम
## ■ नविन व गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान समारंभ संपन्न



किन्ही : प्रतिनिधी

**किन्ही येथे रयत शिक्षण संस्थेच्या सद्गुरू ओंकारबाबा माध्यमिक विद्यालयात शनिवारी विद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ सुरु झाल्याच्या पार्श्वभूमीवर नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत सोहळा मोठ्या दिमाखात संपन्न झाला.**

या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेतकरी नेते तथा स्कूल कमिटी सदस्य अनिल देठे पाटील व स्कूल कमिटी सदस्य विठ्ठल खोडदे , माजी प्राचार्य सावकार शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.यावेळी विद्यालयात नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशद्वारा पासून ते वर्गांपर्यंत ढोल , ताशांच्या निनादात वाजत , गाजत आणुन पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले तसेच दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा व सारथी परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचाही याप्रसंगी सन्मान करण्यात आला व इयत्ता आठवीतील सर्व विद्यार्थ्यांना शासनाच्या वतीने मोफत दिले जाणाऱ्या शालेय पाठ्यपुस्तकांचे उपस्थितांच्या हस्ते वितरण करण्यात आले.

यावेळी विठ्ठल खोडदे , सावकार शिंदे ,आर.एन.गवळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.या प्रसंगी सरपंच पती किरण खोडदे ,अध्यक्ष संपत खोडदे , दादाभाऊ मोढवे,देवराम खोडदे ,कोंडिभाऊ साकुरे , साईनाथ व्यवहारे,प्रविण व्यवहारे,भिकाजी व्यवहारे,सोपान खोडदे , बाळासाहेब खोडदे,प्रथमेश घोडके ,अमोल गवळी सर ,आप्पा रोडे आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी मुख्याध्यापक आर.एन.गवळी सर यांनी केले तर सुत्रसंचालन बापू तांबे सर यांनी केले व श्रीमती ज्योती ठुबे यांनी आभार मानले.

**सद्गुरू ओंकारबाबा माध्यमिक विद्यालयाने दहावीच्या १०० % निकालाची परंपरा कायम ठेवली असुन , शासनाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धात्मक व शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये देखील विद्यालयाचे विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले असुन ,अनेक विद्यार्थी शिष्यवृत्तीचा लाभ घेत आहेत.हि बाब विद्यालयाच्या दृष्टीने भुषणावह आहे.विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी शिक्षकांचे योगदान मोठे असुन यशाची उज्वल परंपरा कायम अबाधित राखण्यासाठी शिक्षक , विद्यार्थी, पालक , ग्रामस्थ यांचे सामुहिक प्रयत्न सदैव आवश्यक आहेत.**

अनिल देठे पाटील, शेतकरी नेते

# जीवनाचा उद्धार करणारे शिक्षण देणे ही काळाची गरज

## ज्ञानदेव लंके (गुरुजी ) यांचे प्रतिपादन
## वाढदिवसानिमित्त दत्तात्रय म्हस्के यांच्या वतीने वही पेन वाटप

चोंभूत : प्रतिनिधी

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांचा मानसिक व बौद्धिक विकास चांगल्या पद्धतीने होतो. आपल्या आसपासच्या परिसरातील उच्च पदावर गेलेले प्रशासकीय अधिकारी हे मराठी माध्यमातून शिकलेले आहेत.कारण प्राथमिक शाळेतील शिक्षण हे उपक्रम शील शिक्षण आहे. सध्याच्या बदलत्या जीवनशैली नुसार जीवनाचा उद्धार करणारे शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. यासाठी मराठी शाळा टिकण्यासाठी व टीकवण्यासाठी ग्रामस्थांनी पुढाकार घ्यावा कारण शालेय पट वाढणे हेच गावचे भूषण आहे. असे प्रतिपादन खासदार नीलेश लंके यांचे पिताश्री ज्ञानदेव लंके गुरुजी यांनी चोंभूत येथील जि. प. प्राथ शाळेतील नवागतांच्या प्रवेशाप्रसंगी कार्यक्रमात केले.**



यावेळी गावचे माजी उपसरपंच दत्तात्रय म्हस्के यांच्या वाढदिवसाच्या निमित्त शालेय विध्यार्थ्यांना वही, पेन वाटप करण्यात आले.यावेळी जेष्ठ नागरिक सुदाम माळी, तात्याभाऊ माळी, सोनभाऊ खांडेकर, लोकनियुक्त सरपंच कांचनताई म्हस्के,शरद पाबळे (सरपंच पिंपरी कावळ),संतोष खाडे, रावसाहेब माळी, लहू म्हस्के,बाबासाहेब म्हस्के, यशवंत सांगडे,बबन कोल्हे,प्रकाश कोल्हे, सुभाष खांडेकर, भिमाजी चोरमले,धनंजय मेहेर,शिर्के सर,शिरोळे सर,साबळे सर, गोरडे मॅडम व आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

### वही पेन वाटप आदर्श उपक्रम

**संपूर्ण पारनेर तालुक्याला खासदार नीलेश लंके यांनी एक आदर्श घालून दिला तो म्हणजे वाढदिवसाचा खर्च वाचवून शालेय विद्यार्थ्यांना वही पेन वाटप करणे हाच आदर्श दत्तात्रय म्हस्के यांनी अंगी बाळगून वर्षानुवर्षे जपत आहेत. म्हस्के यांनी आता गाव पातळीवर कार्य न करता तालुका पातळीवर काम करावे.**

ज्ञानदेव लंके (गुरुजी )


'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com

'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)

Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com